नवीन सेवार्थ प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने **डेटा मायग्रेशनबाबत**
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतर्गत पुणे विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना द्यावयाच्या सूचना...

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९(२)/कोषा प्रशा-४**
दालन क्रमांक ३३९, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २२ मे, २०२६

**वाचा:**-१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४, दि.१७.१०.२०२३
२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४, दि.०१.०४.२०२६

**प्रस्तावना** -

**वाचा क्र.१** येथील परिपत्रकान्वये, नविन सेवार्थ प्रणाली अंमलबजावणी करताना सेवार्थ प्रणालीतील सद्यस्थितीतील डेटा अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव, जन्मदिनांक, मूळ नेमणूकीचा दिनांक, कार्यालयातील नेमणूकीचा दिनांक तसेच सेवानिवृत्ती दिनांक यामध्ये बदल करावयाचे झाल्यास त्याच्या प्रित्यर्थ सेवापुस्तकातील संबंधित पानाच्या स्कॅन प्रती पाठविण्याबाबत व त्यानंतर अशा नोंदी दुरुस्त करुन देण्यात येतील, असे कळविण्यात आले होते.

तसेच **वाचा क्र.२** येथील परिपत्रकान्वये, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतर्गत पुणे विभागातील आहरण व संवितरण अधिकारी यांना नवीन सेवार्थ प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत पुणे विभागातील सर्व कोषागारातील मध्यम व लघु आस्थापना असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचा डेटा मायग्रेशन करुन नवीन प्रणालीत समाविष्ट करण्यात येत आहे.

परंतु प्रत्यक्षात अंमलबजावणी करतांना यापूर्वी देण्यात आलेल्या सूचनेनूसार बऱ्याच आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नाव, जन्मदिनांक, मूळ नेमणूकीचा दिनांक, कार्यालयातील नेमणूकीचा दिनांक तसेच सेवानिवृत्ती दिनांक अचूकपणे अद्ययावत केले नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे नवीन सेवार्थ प्रणालीत डेटा मायग्रेशन करताना, पुणे विभागातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून सेवार्थ प्रणालीमध्ये अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव, जन्मदिनांक, मूळ नेमणूकीचा दिनांक, कार्यालयातील नेमणूकीचा दिनांक तसेच सेवानिवृत्ती दिनांक अचूक करुन देण्याबाबत ईमेलव्दारे विनंती प्राप्त होत आहेत.

उपरोक्त बाबी पाहता, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतर्गत पुणे विभागातील आहरण व संवितरण अधिकारी यांना पुनश्च खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक :-**

पुणे विभागाकरीता नवीन सेवार्थ प्रणालीची अंमलबजावणी करताना निर्दशनास आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने, सेवार्थ प्रणालीतील अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव, जन्मदिनांक, मूळ नेमणूकीचा दिनांक, कार्यालयातील नेमणूकीचा दिनांक तसेच सेवानिवृत्ती दिनांक या नोंदी अद्ययावत करण्यासाठी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतर्गत पुणे विभागातील आहरण व संवितरण अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. प्रथमत: संबंधित कार्यालयाने सेवार्थ प्रणालीतील अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव, जन्मदिनांक, मूळ नेमणूकीचा दिनांक, कार्यालयातील नेमणूकीचा दिनांक तसेच सेवानिवृत्ती दिनांक यापैकी जी बाब अद्ययावत करावयाची आहे, त्या बाबीकरीता संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांने / कार्यालय प्रमुखाने प्रमाणित केलेल्या, अचूक कागदपत्रांच्या संचासह, रितसर प्रस्ताव संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागास सादर करावा.
२. संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या आस्थापना बाबींशी निगडीत असणाऱ्या सहसचिव/ उपसचिव / अवर सचिव यांनी सदर प्रस्तावाबाबत अचूकता तपासावी. त्यानंतर सदर नोंदी सेवार्थ प्रणालीत अद्ययावत करण्यासाठी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिव दर्जाच्या अधिकारी यांचेमार्फत वित्त विभागाकडे नस्ती / प्रस्ताव सादर करावा.
३. वित्त विभागाकडून, संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने दिलेल्या प्रस्तावाची पडताळणी करण्यात येईल व तद्नंतर सदर दुरुस्ती सेवार्थ प्रणालीमध्ये करण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे यांना प्रस्ताव / नस्ती पाठविण्यात येईल.
४. संचालक, लेखा व कोषागारे यांनी प्राप्त प्रस्तावावर / नस्तीवर सुचविलेल्या बाबीची सेवार्थ प्रणालीमध्ये दुरुस्तीची कार्यवाही पूर्ण करुन नस्ती पुन:श्च वित्त विभागाकडे पाठवावी.

तसेच आणखी कळविण्यात येते की, पुणे विभागामध्ये नवीन सेवार्थ प्रणालीची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी निर्देशित करण्यात आलेल्या विभागातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचा जुन्या सेवार्थ प्रणालीतील डेटा नवीन सेवार्थ प्रणालीत जसाच्या तसा (As- Is) स्थानांतरीत (Migrate) होणार असल्याने नवीन सेवार्थ प्रणालीत वेतन देयके तयार होण्यासाठी कोणताही प्रतिबंध असणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०५२२१४२६१४२१०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ASHOK GULAB CHAUDHARI

Digitally signed by ASHOK GULAB CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=3A31F1E61A49658347833C8C22A09CB8141A51CF08DA760FD5E2A1B3C1769153, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3E9FA04602558FF79EC2FCB3553E7DA28D75751FAA9AA5AA2261D3E69F011558, cn=ASHOK GULAB CHAUDHARI
Date: 2026.05.22 14:27:32 +05'30'

**( अशोक चौधरी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

**१. पुणे विभागांतर्गंत सर्व आहरण व संवितरण अधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी / उप कोषागार अधिकारी.**

**२. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.**

**यांना विनंती करण्यात येते की, पुणे विभागातील त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सदर परिपत्रकातील सूचनांचे पालन करण्याबाबत मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या स्तरावरुन देखील कळविण्यात यावे.**

प्रत-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव / प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव.
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख
८. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१४. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२. सर्व विभागीय आयुक्त
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२६. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजी नगर/अमरावती/नागपूर
२८. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर
२९. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३०. निवड नस्ती/कोषा प्रशा-४